

पेटंट मक्तेदारी
की
जनतेशी इमानदारी ?

दत्ता देसाई

पुस्तकाचे नाव: पेटंट मक्तेदारी की जनतेशी इमानदारी?
लेखक: दत्ता देसाई
संपादन/मांडणी: विनया देशपांडे

निर्मिती सहाय्य: प्रसाद गोरे
मुखपृष्ठ मांडणी: गणेश विसपुते
व्यंगचित्रे: इनपोस्टर्स (विकास अध्ययन केंद्र)वरुन साभार
विशेष सहाय्य: समाजविज्ञान अकादमी, पुणे

जवाआं/६३
प्रकाशन : फेब्रुवारी २००५

मूल्य: १० रुपये

प्रकाशक/मुद्रक: विनया देशपांडे
जनवाचन समन्वयक, भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)
२९१, बापटवाडी, शनिवार पेठ, पुणे-४११०३०, फोन: ०२०-२४४३४१३३
मुद्रण स्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,पुणे-४११००४

अक्षर जुळणी: वैशाली गुप्ता

पेटंट मत्तेदारी की जनतेशी इमानदारी?

दत्ता देसाई

भारत ज्ञान विज्ञान समुदाय

चार वर्षांपूर्वी एचआयव्ही/अेडस्‌सारख्या भयावह रोगाच्या मृत्यूछायेखाली जगणाऱ्या जगातील कोट्यवधी लोकांना अेआरव्ही (अँटिरिट्रोव्हायरल) औषधे घेणे परवडत नव्हते. या औषधोपचारांचा खर्च त्यावेळी वर्षाला १०,००० ते १२,००० डॉलर्स म्हणजे अंदाजे रूपये ४,५०,००० ते ५,५०,००० एवढा होता. पण सन २००३ मध्ये हा खर्च वर्षाला १४० डॉलर्स म्हणजे अवघा रु. ६,३०० एवढा खाली आला !

हा चमत्कार कसा झाला ? याचे उत्तर त्यावेळच्या भारतीय पेटंट कायद्यात होते. यामध्ये फक्त प्रक्रिया पेटंट घेता येत असे, उत्पादनाचे (प्रॉडक्ट) पेटंट घेता येत नसे. त्यामुळे नव्या प्रक्रियेने तेच औषध तयार करून ते एवढ्या स्वस्तात विकणे शक्य होते.

पण एचआयव्ही/अेड्स रूग्णांचा हा आसरादेखील आता काढून घेतला जाईल- भारतीय पेटंट कायद्यातील २००४ च्या बदलामुळे!

ल्युकेमियाच्या (रक्ताचा कर्करोग) रूग्णांना पूर्वी ग्लीव्हीक हे औषध १००० रु.ला १ गोळी या दराने विकत घ्यावे लागत होते. भारतात प्रक्रिया पेटंट असल्यामुळे हे मूळ औषध (जेनेरिक ड्रग) तयार करून रु.९९ ला १ गोळी या दराने उपलब्ध केले गेले. मात्र १९९९ मध्ये भारतीय पेटंट कायद्यात बदल करून पणनाचे/विक्रीचे विशेषाधिकार देण्याची तरतूद केली गेली. नोवार्टीस या बहुराष्ट्रीय कंपनीने भारतातील या स्वस्त औषधाचे उत्पादन त्वरित थांबवण्याची मागणी केली. भारतीय कंपनी न्यायालयाकडे गेली. पण चेन्नईच्या उच्च न्यायालयाने नोवार्टीसचा पणन विशेषाधिकार उचलून धरला. भारतीय कंपन्यांचे पर्यायी उत्पादन थांबवले. ल्युकेमियावरील या औषधोपचाराला आता महिन्याला १ लाख ते १,२०,००० रुपये खर्च येतो. किती रूग्णांना हा खर्च झेपेल?

आता २००४ च्या वटहुकूमाचे संसदेच्या माध्यमातून रीतसर कायद्यात रुपांतर होणार आहे.

देशात या विषयावर आज उलटसुलट चर्चा सुरु आहे. काही लोकांच्या मते पेटंट कायद्यातील हे बदल अटळ आहेत. कारण ती जागतिकीकरणाची गरज आहे. आपण जागतिक व्यापार सघंटनेचे सभासद आहोत आणि सरकार आता करत असलेले बदल हे आवश्यक व बंधनकारक आहेत. तर काहींच्या मते या बदलांमुळे घाबरुन जाण्याचे मुळीच कारण नाही. उलट आपल्या देशातील कल्पकतेला, नवे शोध लावण्याच्या वृत्तीला वाव मिळेल. आपल्या औषध कंपन्या आता एवढ्या तगड्या झाल्यात की बहुराष्ट्रीय कंपन्यांशी त्या सहज स्पर्धा करतील. सॉफ्टवेअरमध्ये तर आता आपण जगातील महासत्ता बनत आहोत, त्यामुळे पेटंट कायद्यातील बदलांचे भय आपण बाळगण्याचे कारण नाही.

पण उलट बाजूने या बदलांचे देशावर व बहुसंख्य जनतेवर गंभीर दुष्परिणाम होतील असे म्हटले जात आहे. जनतेच्या हितासाठी जे बदल करायला हवे ते सरकारने केलेले नाहीत. उलट जागतिक व्यापार संघटनेने सांगितल्यापेक्षा जास्त बदल करुन बहुराष्ट्रीय कंपन्यांची हांजी हांजी सरकार करत आहे असेही म्हटले जात आहे.

अशा वेळी आपण फक्त बघ्याची भूमिका घेऊन भागणार नाही. या कायदे बदलाचा अर्थ जाणला पाहिजे आणि राजकारण ओळखले पाहिजे. लोकांच्या व देशाच्या हिताला प्राधान्य देणारे बदल या कायद्यात घडवून आणण्यासाठी सरकारवर जनमताचा दबाव आणला पाहिजे.

पेटंटचा हा प्रश्न नेमका काय आहे?

पेटंट म्हणजे काय?

नवीन कल्पक उत्पादने आणि कल्पक उत्पादनपद्धती यांचे उत्पादन आणि विक्री करण्याचे मर्यादित मुदतीचे सार्वभौम राज्यसत्तेने संशोधकाला प्रदान केलेले एकाधिकार म्हणजे पेटंट किंवा एकस्व. अशा शोधांचा काही एक मोबदला संशोधकाला मिळावा पण या शोधांचा फायदा मात्र संपूर्ण समाजाला मिळावा यासाठी ही पध्दत अस्तित्वात आली. सुरुवातीला त्याचा

उपयोगही झाला. पण आता या पध्दतीचा वापर जगभरातल्या बहुराष्ट्रीय व देशी मक्तेदारी कंपन्या स्वत:च्या नफेखोरीसाठी करत आहेत. म्हणून प्रश्न गुंतागुंतीचा बनला आहे.

वैज्ञानिक शोध आणि पेटंट

निसर्गात जे आहे त्याचे मानवाला जेव्हा पहिल्यांदा आकलन होते तेव्हा ती Discovery असते. निसर्गात जे नाही ते माणूस जेव्हा पहिल्यांदा बनवतो तेव्हा ते Invention असते. Discovery साठी पेटंट मिळत नाही, पेटंट फक्त Invention साठीच मिळू शकते असेच आजवरचे तत्व होते. मात्र नव्या कायद्यामुळे या दोहोंतील भेद धूसर केला जात असून नैसर्गिक प्रक्रियांवरही मक्तेदारी अधिकार करण्याची मुभा व्यापारी कंपन्यांना दिली जात आहे.

भारतातील पेटंट कायदे

१८५६ मध्ये इंग्रजांनी भारतात पहिला पेटंट कायदा बनवला. त्यानंतर १८७२, १८८३, १८८८ साली नवे कायदे बनवले.१९११ साली पूर्वीच्या सर्व कायद्यांना रद्द करुन 'इंडियन पेटंट आणि डिझाइन कायदा' केला. तो स्वातंत्र्यानंतर १९७० सालापर्यंतही चालू होता.

इंग्रजांनी बनवलेला १९११ चा पेटंट कायदा हा भारतीय उद्योजकांच्या विरोधी होता. तो परकीय मालासाठी भारतीय बाजारपेठ राखून ठेवण्यासाठी वापरला गेला. यात प्रॉडक्ट पेटंटचीही तरतूद होती. या कायद्यामुळे भारतीयांच्या कल्पक, शोधक प्रवृत्तींना विशेष चालना मिळाली नाही. भारतातल्या बहुसंख्य लोकांपर्यंत नव्या शोधांचे फायदे पोहोचू शकले नाहीत. म्हणून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तब्बल २३ वर्षांनी, सखोल अभ्यास आणि चर्चेनंतर १९७० मध्ये भारतीय पेटंट कायदा लोकसभेने मंजूर केला. तो १९७२ पासून अंमलात आला.

भारतीय पेटंट कायदा - १९७० मधील महत्वाच्या तरतुदी

या कायद्यात पेटंटधारकाला काही अधिकार देत असतानाच जनतेच्या व देशाच्या हिताचाही काही एक विचार निश्चितपणे होता. या कायद्यात खालील गोष्टींसाठी पेटंटचा एकाधिकार घेणे शक्य होते:

१) अन्नपदार्थ आणि औषधे बनवण्याच्या कल्पक (नाविन्यपूर्ण/अभिनव) प्रक्रियांसाठी ७ वर्षांचे एकाधिकार .

२) इतर कल्पक उत्पादनांसाठी १४ वर्षांचे एकाधिकार .

या कायद्यात खालील गोष्टींसाठीचे एकाधिकार नव्हते:

१) अणुशक्तीशी संबंधित कल्पक उत्पादने .

२) रासायनिक प्रक्रियांव्दारे बनलेली उत्पादने .

३) अन्न आणि औषधे यांची उत्पादने (प्रॉडक्ट)

४) शेती आणि फळबागा करण्याच्या पध्दती .

५) सरकारी कामासाठी वापरलेली उत्पादने किंवा उत्पादन प्रक्रिया .

६) औषधोपचार, शस्त्रक्रिया, सूक्ष्मजीव इत्यादींच्या अशा पध्दती की ज्यामुळे माणूस, जनावर, वनस्पती यांना रोगमुक्त करता येईल किंवा त्यांचे आर्थिक मूल्य वाढवता येईल.

१९७० च्या पेटंट कायद्यामुळे केलेली कमाई

या कायद्यामुळे जगाने नोंद घ्यावी अशी कमाई आपण केली :

- नवनवीन औषधांची उपलब्धता वाढली.
- औषधांच्या किंमती कमी झाल्या.
- औषधांच्या क्षेत्रातील स्वावलंबन वाढले.
- कीटकनाशकांचे उत्पादन भारतात होऊ लागले. रासायनिक खते-कीटकनाशके स्वस्तात मिळू लागली.
- अणुऊर्जेच्या क्षेत्रात भरीव प्रगती झाली.
- सुधारित बियाणांची निर्मिती शेतकऱ्यांना सहज व स्वस्तात उपलब्ध झाली.

पेटंट रद्द करण्याची व सक्तीच्या परवान्याची तरतूद

१९७० च्या भारतीय पेटंट कायद्याखाली ही तरतूद पुढील बाबतीत लागू होती :

→ जर समाजाच्या योग्य गरजा पुऱ्या होत नसतील,

→ अस्तित्वात असलेल्या किंवा नव्याने निर्माण होत असलेल्या उद्योगाच्या विकासाच्या आड ते पेटंट येत असेल,

→ भारतात त्या उत्पादनाचे पुरेशा प्रमाणावर उत्पादन करून ते योग्य किंमतीत उपलब्ध केले जात नसेल,

→ भारतात निर्माण होणाऱ्या उत्पादनाला उपलब्ध असलेली निर्यात बाजारपेठेतील मागणी पुरी केली जात नसेल,

तर दिलेल्या पेटंटचा एकाधिकार रद्द करण्याचा अधिकार सरकारला होता.

एखाद्या पेटंटधारकाने पेटंटचा वापर केला नाही तर तीन वर्षांनी सरकार पेटंटधारकावर ते तंत्रज्ञान दुसऱ्याला विकण्याची सक्ती करु शकते. त्यानंतर दोन वर्षातसुध्दा जर पेटंट धारकाने पेटंटचा वापरही केला नाही आणि ते तंत्रज्ञान विकलेही नाही तर ते पेटंट रद्द केले जाऊ शकते, अशी तरतूद भारतीय पेटंट कायद्यात होती.

बदलते जागतिक संदर्भ

दुसऱ्या महायुध्दानंतरच्या काळात पेटंटकडे बघण्याचे दोन प्रमुख दृष्टिकोन होते:

१) प्रगत औद्योगिक राष्ट्रातील मोठ्या कंपन्यांना जास्तीत जास्त प्रकारच्या नव्हे, सर्वच प्रकारच्या संशोधनावर एकाधिकारी मक्तेदारी असली पाहिजे असे वाटत होते.

२) मक्तेदारी एकाधिकार मान्य करताना देशातील सार्वजनिक हिताचे रक्षण होते की नाही हे पाहणे आणि होत नसल्यास एकाधिकार मान्य न करण्याचा आमचा सार्वभौम अधिकार आहे असे विकसनशील देशाच्या सरकारांचे म्हणणे होते.

भारतातील पेटंट कायद्यात हा दुसरा दृष्टिकोन स्पष्टपणे उतरला. म्हणून आपला कायदा हा तिसऱ्या जगातील आदर्श पेटंट कायदा ठरला.

१९८० नंतर अमेरिकेच्या पेटंट कायद्यात महत्वाचे बदल होत गेले. तिसरे जग प्रचंड कर्जबाजारी झाले होते. स्वत:च्या विकासासाठी जगात नव्या बाजारपेठा आणि नवे क्षेत्रे यावर कब्जा मिळवणे प्रगत देशांना आवश्यक वाटू लागले होते. यातून जागतिकीकरण या गोंडस नावाची एक प्रक्रिया गतिमान झाली.

बहुराष्ट्रीय व मक्तेदारी भांडवल

↓

जागतिक व्यापारी संघटना
(WTO)

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी
(IMF) ↘ ↓ ↙ **जागतिक बँक**
(WB)

जागतिकीकरण

जागतिक अर्थनितीमध्ये 'बाजारपेठी' सुसंगती आणण्याच्या प्रक्रियेसाठी विविध करार व धोरणे

अनुदान कपात, खुली आयात-निर्यात, खाजगीकरण, विदेशी गुंतवणुकीला मोकळीक, सार्वजनिक खर्चात कपात, बौध्दिक मालमत्तेचे अधिकार

(पेटंट्स, ट्रेड मार्क्स, औद्योगिक डिझाइन्स, कॉपीराईट, इंटिग्रेटेड सर्कीट्स, व्यापारी गुपिते, भौगोलिक वैशिष्ट्यदर्शक वस्तू)

⇙ ⇘

बहुराष्ट्रीय कंपन्या व प्रगत देशांचे वाढते वर्चस्व

गरीब देशातील बहुसंख्य जनतेच्या हलाखीत भर

भारताच्या पेटंट कायद्यातील बदल

भारताच्या पेटंट कायद्यातील बदल हा या जागतिकीकरणाचाच एक भाग आहे.

✦ जागतिक व्यापार संघटनेत बौध्दिक मालमत्तेच्या अधिकारांचा करार (ट्रीप्स) अंमलात येण्याआधीच भारतात पणनाचे (बाजारपेठेचे) विशेष अधिकार देण्याची तरतूद करणारा वटहुकूम काढला गेला. त्याच्या कायद्याचे बिल राज्यसभेत अडवले गेले . मग १९९६ मध्ये संसद विसर्जित झाली. अमेरिका व युरोपीय समुदायाने जागतिक व्यापार संघटनेत याबाबत तक्रार केली. पुन्हा हा कायदा संसदेसमोर आला. तरीही शेवटी वटहुकूम व मग संसदेत कायदा अशी ही पहिली दुरुस्ती मार्च १९९९ मध्ये केली गेली. त्यानुसार पेटंटअर्ज 'मेल बॉक्स' मध्ये ठेवून त्या कंपन्यांना विपणनाचे विशेषाधिकार देण्यास सुरुवात झाली.

✦ दुसऱ्या दुरुस्तीसाठीचे बिल १९९९ मध्ये आले. पण त्याविरुध्दही बराच संघर्ष झाला. शेवटी ती दुरुस्ती मे २००२ मध्ये संसदेने मान्य केली. या दुरुस्तीमुळे मुख्यतः पेटंटची कालमर्यादा २० वर्षांपर्यंत वाढली, तसेच सूक्ष्मजीव व जैविक प्रक्रिया, कृषि रसायने आणि सॉफ्टवेअर यांचा अंतर्भाव या कायद्यात करण्यात आला. एकंदर ६४ दुरुस्त्या केल्या गेल्या.

✦ २७ डिसेंबर २००४ रोजी केंद्राने १९७० च्या भारतीय पेटंट कायद्यामध्ये तिसरी दुरुस्ती सुचवणारा वटहुकूम काढला. आजवर १९७० च्या कायद्याबाबत औषधे, अन्न व रसायने यांच्या उत्पादन **प्रक्रियेवर** (Process) पेटंट अधिकार मिळत असत. परंतु या नवीन वटहुकुमानुसार औषधे,अन्न व रसायने या क्षेत्रातील **उत्पादनांवरही** (Product) पेटंट अधिकार मिळण्याची तरतूद आहे. या दुरुस्तीमध्ये फक्त दोनच गोष्टींची गरज होती: पणन विशेषाधिकाराची तरतूद बदलणे आणि उत्पादन (प्रॉडक्ट) पेटंटची तरतूद करणे. प्रत्यक्षात या दुरुस्तीत आणखी ७० बदल करण्यात आले आहेत! बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या सोयीसाठी त्या केल्या गेल्या आहेत असे अभ्यासक म्हणतात.

भारत सरकारची कणाहीन वागणूक!

या सर्व काळात भारत सरकारची वागणूक जागतिक सत्तांपुढे 'करीन वंदन, घालीन लोटांगण' अशीच राहिली.

➢ संसदेत चर्चाही न करता भारत सरकारने १९९४ मध्ये गॅटकरारावर सही केली.

➢ २००२ मध्ये बदल करून जो पेटंट कायदा समोर आला त्याची भाषा ट्रीप्सबरहुकूम! पूर्ण इमानदारी जागतिक व्यापार संघटनेशी!

➢ २००४ ची तिसरी दुरुस्ती वटहुकुमाचा वापर करुन.

➢ सरकारनेच कबूल केल्याप्रमाणे सन २००४ अखेरपर्यंत फक्त उत्पादनाचे (प्रॉडक्ट) पेटंट कायद्यात समाविष्ट करणे बंधनकारक होते. सॉफ्टवेअर त्याखाली आणण्याची कोणतीही गरज नसताना सरकारने ती आणली.

➢ तारीख पाळण्याचा बाऊ करण्यापेक्षा सरकारने देशात यावर लोकशाही प्रक्रिया होण्याची गरज जागतिक व्यापार संघटनेकडे नोंदवायला हवी होती.

➢ १ जानेवारी २००५ ह्या मर्यादेच्या टांगत्या तलवारीला भारत सरकारने घाबरण्याची जरुरी नव्हती. कारण ब्रिटनने तीन वर्षे, फ्रान्सने एक वर्ष आणि अर्जेंटिनाने चार वर्षे उशिराने ह्या कायद्याच्या तरतुदी अंमलात आणल्या आणि त्यांना कुठलाही दंड झाला नाही.

➢ पेटंट कायद्यात बदल केला नसता तर कापड निर्यात विषयक कराराची अंमलबजावणी झाली नसती असाही बागूलबुवा उभा केला जातो. पण जागतिक व्यापार संघटनेच्या व्यापार परिषदेने यापूर्वीच याविषयी स्पष्ट निकाल दिलेला असल्याने अन्य कोणतेही देश अशी दादागिरी करणे शक्य नव्हते. तरीही हा घाबरटपणा का केला गेला?

➢ १९९९ मध्ये जागतिक व्यापार संघटनेच्या विरोधात सिएटल येथे जागतिक जनप्रक्षोभ अनुभवाला आला. त्यामुळे जगात यावर थोडा वेगळा विचारही सुरू झाला. मूलभूत मानवी अधिकार पूर्ण पायदळी तुडवणारे आरोग्य व अन्न या क्षेत्रांत बौध्दिक मालमत्ता अधिकार लावण्याविषयी अभ्यासकांनी साशंकता व्यक्त केली आहे. एचआयव्ही-अेडस् च्या वाढत्या धोक्यापासून तो वाढत्या जागतिक विषमतेपर्यंत अनेक महत्वपूर्ण मुद्दे असे आहेत की ज्यामुळे पेटंट मक्तेदारी ही निषेधार्ह ठरते. म्हणून बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या नफेखोरीसाठी या करारांचा वापर करू नये, उलट जागतिक व्यापार संघटनेच्या व ट्रीप्स कराराच्या चौकटीत जो वाव आहे त्याचा लवचिकपणे करावा हा विचार जगात प्रबळ होत आहे.

➢अमेरिका, फ्रान्स, कॅनडा, ब्रिटन, झिम्बाब्वे, युगांडा, आफ्रिका खंड येथील जनसंघटनांनी भारताच्या पंतप्रधानांना निवेदने पाठवली आहेत. दक्षिण पूर्व आशियातील जनसंघटनांनी भारताच्या राष्ट्रपतींना विनंती केली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने भारताच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्याना १७ डिसेंबर, २००४ रोजी पत्र पाठवले आहे. या सगळ्यांनी भारतातील नव्या पेटंट कायदा दुरुस्तीमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. जगभरच्या रुग्णांना माफक दरात औषधे पुरवण्याचे धोरण चालू ठेवावे व त्या दृष्टीने योग्य असेच बदल पेटंट कायद्यात करावेत अशी विनंती या सर्वांनी केली आहे.

➢ गेल्या १० वर्षात अनेक तज्ञांनी व पेटंटबाबतच्या राष्ट्रीय गटाने देशाच्या व जनतेच्या हिताच्या दृष्टीने अनेक सुधारणा सुचवल्या आहेत. पण त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून सरकार या कायद्यात अनावश्यक व अपायकारक बदल करत आहे.

विषम जगात पेटंटला 'न्याय्य' मोबदला ?

वेळ, पैसा, शक्ती आणि कल्पकता वापरुन जे शोध एकंदर मानवजातीच्या सेवेत पेटंटधारकाने सादर केलेले असतील त्याचा योग्य मोबदला त्याला मिळायला हवा असे म्हटले जाते. यासाठी जगभर सर्वत्र सारखेच नियम असावेत असेही म्हटले जाते. पण वास्तव काय आहे?

हे जग मुळात विषम आहे. या तरतुदींचा वास्तवात काय अर्थ होईल हे समजून घ्यायचे तर विकसनशील देश व प्रगत देश यांच्यात भांडवल, बचत, गुंतवणूक, देशांतर्गत व विदेशी कर्जे, व्यापार, परकीय चलन, तंत्रज्ञान, उत्पादन, राहणीमान, चलनवाढ, रोजगार, उपभोगाची पातळी, किंमती, इत्यादी प्रत्येक क्षेत्रात विषमता आहे. आज जगातील सर्व देश जरी परस्परावलंबी (interdependent) असले तरी त्यातील बरेच देश आयात, निर्यात, भांडवल, तंत्रज्ञान या बाबतीत इतरांवर जास्त अवलंबून म्हणजेच 'परावलंबी' आहेत. त्यामुळे सगळीकडे एकसारखा कायदा असल्याने न्याय प्रस्थापित होऊ शकतो का किंवा अमेरिकेत जो मोबदला 'न्याय्य' असेल तो भारतातही न्याय्य ठरेल का असा प्रश्न असतो.

उदाहरणार्थ, भारतातून चांगल्या दर्जाचा जो चहा निर्यात होतो त्याची किंमत सरासरी एका किलोला २ अमेरिकन डॉलर एवढी असते. पण न्यूयॉर्क शहरात एक कप चहा २ डॉलर अथवा त्याहून महाग मिळतो. दुसरे असे की अमेरिका-युरोपातील खर्चाची पातळी इतकी प्रचंड आहे की गरीब देशांना तो खर्चसुध्दा असह्य बोजा ठरतो. शिवाय व्यवहारात या खर्चात अव्वाच्या सव्वा नफ्याची रक्कम लावून किंमती लावल्या जातात. नवे शोध-तंत्रज्ञान, नवी उत्पादने यांचा वापर करुन गरीब-विकसनशील देशांकडून प्रचंड नफा कमावला जातो.अमेरिकेच्या व अन्य प्रगत देशांच्या औषध कंपन्या अशा रीतीने हजारो कोटी डॉलर्सचा नफा परदेशातून अमेरिकेत आणतात. आणि हे विषमतेचे चक्र चालूच ठेवले जाते. त्यातील काही भाग 'राजकीय' कामासाठी देऊन अमेरिकी व बड्या राष्ट्रातील शासनकर्त्यांचा व राजकारण्यांचा पाठिंबा मिळवून हेच धोरण पुढे रेटत ठेवले जाते. तसेच त्यातील छोटासा भाग नव्या शोधांसाठी वापरला जातो. तर काही भाग चक्क जगभर चाललेले संशोधनाचे कार्य व नवे शोध विकत घेण्यासाठी या कंपन्या वापरतात आणि काहीवेळा तर असे शोध चोरुन पळवण्यासाठीही ही रक्कम वापरली जाते.

संशोधकाला मोबदला हा मुद्दा आता गौण बनला आहे व संशोधनाच्या आधारे भरमसाठ नफा हे मुख्य तत्व झाले आहे. अशीच विषमता सर्व देशांच्या अंतर्गत उतरंडवजा रचनेत आहे. त्यामुळे जागतिकीकरणाचे विविध वर्गांवर बरे वाईट परिणाम

होत आहेत. पेटंट मक्तेदारी त्यात कोणती भर घालेल हे वेगळे सांगायला नको!

भारतीय औषध उद्योग: वाढती मक्तेदारी, भरमसाठ किंमती

जगात रोज एच्आयव्ही/एड्सबाधित रुग्णांपैकी ८,५०० रुग्ण योग्य व पुरेसा उपचार न मिळाल्याने मृत्यूमुखी पडतात. जगातील ४ कोटी एच्आयव्ही/एड्सबधित व्यक्तींपैकी ६० लाख जणांना तातडीने उपचार आवश्यक आहेत. भारतात हा आजार एखाद्या साथी प्रमाणे पसरत असून देशातील ५० लाख रुग्णांपैकी ५ लाखांना तातडीने औषधे हवी आहेत. क्षय, मधुमेह, हिवताप, फायलेरिया, या रोगांचे जगातील सर्वाधिक रोगी भारतात आहेत. हृदय विकाराचे रोगी झपाट्याने वाढत आहेत. या आजारांवरच्या स्वस्त औषधांनी भारतातील तसेच जगभरच्या विकसनशील देशातील सामान्य जनतेला काही एक दिलासा नक्कीच दिला होता. पण पेटंट कायद्यातील

औषधांच्या किंमतीची झलक (सर्व किंमती रुपयात)						
औषधाचे नांव	प्रमाण मि.ग्रॅम	भारत	पाकिस्तान	इंडोनेशिया	इंग्लड	अमेरिका
सिप्रोफ्लोक्सॅसीन (प्रतिजैवक)	५००	२.९०	४२.३९	३३.९०	११८.५७	२३५.२४
नॉरफ्लोक्सॅसीन (प्रतिजैवक)	४००	२.०७	१६.८७	१३.०६	३०.४८	१८४.३७
ओफ्लोक्सॅसीन (प्रतिजैवक)	२००	४.००	२४.९३	२०.४३	८१.८३	१९७.३८
डायक्लोफेनॅक सोडियम	५०	०.३५	८.४७	५.९८	६.१०	६७.४८
रॅनिटीडाईन (पित्तशामक)	१५०	०.६०	७.४१	१७.८३	२४.७२	८६.३६
ओमप्रॅझील	३०	२.२५	५७.८०	२९.०८	८७.१०	२०४.७५
ॲम्लोडायपीन बेसिलेट	५	०.७८	२०.०३	७.८४	३३.८३	६६.०२
कॅटिरझाईन	१०	०.६०	३.५७	५.७५	२६.२२	९२.७३
सिल्डेनाफील सायट्रेट	५०	१२.००	-	३३९.२३	४०३.७२	४३६.२३

नव्या बदलांमुळे ही औषधे अतिमहागडी होऊन किंमती न परवडल्याने लाखो लोक मरणाच्या खाईत लोटले जातील.

या नव्या बदलांमुळे भारताला फारसा धोका नाही, भारतावर त्याचे अनिष्ट परिणाम होणार नाही असे म्हटले जाते. कारण आज वापरात असलेली बहुसंख्य औषधे पेटंट कायद्याखाली येणार नाहीत असा युक्तिवाद केला जातो. हे खरे असले तरी हा 'आनंद' फार तर ५-७ वर्षे टिकेल. कारण साधारणपणे ५-७ वर्षांनंतर संपूर्णपणे नवी अथवा नव्या मिश्रणाची औषधे वापरात येत असतात. त्यामुळे पुढील ५-७ वर्षांनंतर वाढत्या प्रमाणावर पेटंट खालील औषधे वापरात येतील. त्यांच्यावरील मक्तेदारीमुळे ही औषधे अधिकाधिक महागड्या दराने विकली जातील.

सोबतच्या तक्त्यावर एक नजर टाकली तरी लक्षात येईल की आज भारतातील विविध औषधांच्या किंमती किती कमी आहेत. पाकिस्तान व इंडोनेशिया सारख्या देशांमध्ये किंमती भारतापेक्षा किमान ६ पट ते कमाल २०-२५ पट जादा आहेत. येत्या काळात भारतातील स्वस्त औषध उत्पादन घटल्याने भारतातील किंमती पाकिस्तान-इंडोनेशियाच्या पातळीवर जातील. एवढेच नव्हे तर एकीकडे भारतातून स्वस्त निर्यात घटल्याने व दुसरीकडे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या महागड्या औषधांचा प्रसार झाल्याने भारतासह सर्वच विकसनशील देशातील औषध-किंमती इंग्लंड-अमेरिकेच्या किंमतींच्या दिशेने झेपावतील.

खरोखरच पेटंटचा फायदा कोणाला?

परकीय कंपन्यांना भारतीय उद्योग यशस्वीपणे तोंड देऊ शकतील एवढेच नव्हे तर त्याही 'जागतिक' स्पर्धेत उतरतील असे म्हटले जाते. पण प्रत्यक्षात काय घडेल ?

अमेरिकेसारखे प्रगत देश व युरोपीय संघातील देश यांच्याकडे मिळून जगातील ९७ टक्के पेटंटस अधिकार आहेत. उत्पादन आणि तंत्रज्ञानाची ९० टक्के पेटंटस् बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे आहेत. त्यांच्या पेटंटपैकी ९४-९५ टक्के पेटंट या कंपन्या न

वापरता कडीकुलुपात बंद ठेवतात. दुसऱ्या कोणाला पर्यायी व स्वस्त उत्पादन घेता येऊ नये म्हणून या कंपन्या पेटंट अशी बंद करून ठेवतात. म्हणजे कंपन्यांच्या नफ्यासाठी संपूर्ण जगाला या शास्त्रीय शोधाच्या फायद्यापासून वंचित रहावे लागते!

नव्या तरतुदीमुळे आंतरराष्ट्रीय देखरेखीखाली विशेष परवान्याने भारत एचआयव्हीची स्वस्त औषधे आफ्रिकेतील अतिगरीब देशांना निर्यात करू शकेल पण हीच औषधे भारतात विकण्यावर मात्र बंदी असेल - हे जागतिक व्यापार संघटनेत मंत्रीस्तरीय बैठकीत पेटंटचा नवा कायदा लागू झाल्याने ठरले आहे.

भारतीय कंपन्या आजवर उत्पादित करत असलेली ३९ औषधे बाजारपेठेतून मागे घ्यावी लागतील आणि ती आंतरराष्ट्रीय म्हणजेच भरमसाठ किंमतीलाच मिळू शकतील. सध्या बाजारात असलेले, देशात उत्पादन होणारे आणि ज्यांना १ जानेवारी २००५ नंतर पेटंट मिळेल अशी ३० प्रमुख औषधे असून त्यांची वार्षिक उलाढाल काही हजार कोटी रुपयात जाते. या औषधांच्या किंमती तर नक्की वाढतीलच पण १.१.२००५ नंतर पेटंट नोंद होणारी नवी बहुसंख्य औषधे बहुराष्ट्रीय कंपन्याकडून नोंदवली जातील आणि या कंपन्या 'मक्तेदारी' किंमत लावतील. सध्या अमेरिका (यूएस), चीन व इतरत्र महत्वाच्या देशांमध्ये पेटंटसाठी वर्षाला ३ लाख अर्ज दाखल केले जातात. परिणामी जगभरात आणि साहजिकच भारतात पेटंट औषधांचा महापूर पसरेल. त्याचा फटका भारतीय औषध उद्योगाला, ग्राहकांना आणि विशेषत: सर्वसामान्यांना बसेल. भारतीय पेटंट कार्यालय बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या पेटंटच्या माऱ्याने पूर्ण जाम होईल. पणन विशेषाधिकाराखाली 'मेल बॉक्स' मध्ये ६ ते ७ हजार अर्ज पडून आहेत ज्यावर आता पेटंट द्यायची आहेत.

एकीकडे यासाठी पुरेशी यंत्रणा नाही तर दुसरीकडे बहुराष्ट्रीय कंपन्या कोर्टकज्जे,प्रचंड खर्च, आंतरराष्ट्रीय मारामाऱ्या यामध्ये देशी कंपन्यांना अडकवतील. यातून 'औषध-युध्द' छेडले जाईल. बहुराष्ट्रीय कंपन्याचे दावे आणि दबाव यांचा परिणामांचा अंदाज प्रारंभी उल्लेखलेल्या एड्स व रक्ताचा कर्करोग विषयक औषधांच्या दोन घटनांवरुन येऊ शकतो.

> युनिव्हर्सिटी ऑफ फिलिपाईन्स येथील प्रसिद्द अभ्यासक वॉल्डन बेलो एड्स वरील बँकॉक येथील परिषदेत २००४ साली म्हणाले होते - अव्वाच्या सव्वा नफे हेच बहुराष्ट्रीय कंपन्यांचे मुख्य उद्दिष्ट असते. उष्ण-कटिबंधातील आजारांवरील १९७५ ते १९९७ या काळात पेटंट घेतलेल्या १२३३ औषधांपैकी फक्त १३ औषधे बाजारात आणली गेली. का? तर म्हणे ही बाकीची औषधे व्हायग्राप्रमाणे नफा कमवत नाहीत!

सोय, पण बहुराष्ट्रीय कंपन्यांची!

एकाच औषधावर, रासायनिक उत्पादनावर अनेक अंगांनी मक्तेदारी केली जाते. उदा. डोस,क्षार,मिश्रण,अन्य रासायनिक घटक (आयसोमर्स, पॉलिमॉर्फ्स, इ.) नवी उत्पादन प्रक्रिया इत्यादी. त्यामुळे मूळ पेटंटची मर्यादा संपली तरी या विविध अंगांनी पेटंट घेऊन ही मक्तेदारी दीर्घकाळ टिकवली जाऊ शकते. अशी पेटंट (मक्तेदारी) 'सदासतेज'(एव्हरग्रीन) ठेवण्याचे कारस्थान होऊ द्यायचे नसेल तर पेटंट ही फक्त नव्या रासायनिक पदार्थांनाच मिळण्याची तरतूद हवी. ट्रीप्स करारात यासाठी जागा आहे. मात्र आपल्या वटहुकुमाने आगाऊपणा केला आहे. गरजेपेक्षा पुढे जाऊन आता माहीती असलेल्या व वापरात असलेल्या औषधांच्या नव्या वापरावरही पेटंट देण्याची सोय केली आहे. ही मक्तेदारीधार्जिणी तरतूद रद्द करायला हवी. युरोपीय समुदाय आणि ऑस्ट्रेलिया यांनीही हे केले आहे. कॅनडाचे संसदसदस्य तसेच अमेरिकेतील तज्ञही यावर विचार करत आहेत. आपणही हे करणे आवश्यक आहे.

हे खरे की 'पेटंट' च्या नव्या कायद्यात भारताने समांतर आयातीची तरतूद केली आहे. याचा अर्थ पेटंट असलेल्या वस्तूंची/औषधांची इतर देशांच्या बाजारातून पेटंटधारकाच्या संमतीशिवाय आयात करणे. पण ही तरतूद करतानाही सरकारने 'पेटंटधारकाने अधिकृत नेमलेल्या प्रतिनिधीकडून' अशी आयात करणे ग्राह्य ठरवले आहे. यामुळे आपल्यासमोर अडचणी

येऊ शकतात, विलंब होऊ शकतो. जागतिक व्यापार संघटनेच्या चौकटीत अशा कोणत्याही स्पष्ट शब्दरचनेची गरज नसताना भारताने ती निष्कारण केली आहे.

माहिती संरक्षणाचा हक्क : एखाद्या पेटंटची कालमर्यादा संपल्यानंतर त्या माहितीवर आधारित मूळ औषधाचे (जेनेरिक) उत्पादन इतर उत्पादक कंपन्या करु शकतात. जर ही माहिती संरक्षित रुपात ठेवण्याची कायद्यात तरतूद नसेल तर अन्य कंपन्यांना ती लगेच वापरता येऊ शकते. पण जर मूळ पेटंटधारकाला समजा १० वर्षे माहिती संरक्षित करण्याचा अधिकार दिला तर आधी २० वर्षे पेटंटची अधिक ही १० वर्षे अशी एकूण ३० वर्षे ही मक्तेदारी चालू शकते. ट्रीप्समध्ये आणि आपल्या कायद्यामध्ये याबाबतही कोणतेही संरक्षण देण्याची गरज नमूद केलेली नाही. पण अशी तरतूद भारताने करावी यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्या आणि अमेरिकी शासन आपल्यावर दडपण आणत असून पेटंट वटहुकुमानंतर सरकार याविषयीची तरतूद करण्याच्या विचारात असल्याबद्दल आपल्या व्यापार-उद्योग मंत्र्यांनी सूचक विधान केले आहे.

कॅनडामधील सक्तीच्या परवानापध्दतीचा (१९६९ ते १९९२) अनुभव

- सक्तीच्या परवाना पध्दतीने आपल्याला परवाना मिळावा म्हणून कोणीही अर्ज करु शके.
- विलंब टाळण्यासाठी कालमर्यादा होती. त्याचा निर्णय पेटंट आयुक्त करत असे.
- अपवाद वगळता जणू 'हक्क' म्हणून हा परवाना दिला जाई. यामुळे स्पर्धा वाढते व किंमती कमी होतात अशी लोकहिताची दृष्टी यामागे होती.
- कॅनडाच्या सर्वोच्च न्यायालयाने नेहमीच आयुक्तांची बाजू उचलून धरली.
- आयुक्तांनी असा परवाना देताना नव्या वापरदाराने मूळ पेटंटधारकास फक्त ४% शुल्क (रॉयल्टी) देण्याचा पायंडा पाडला.

बड्या राष्ट्रांची दुटप्पी नीती

'डॉक्टर्स विदाऊट बॉर्डर्स', हेल्थ अॅक्शन इंटरनॅशनल, कंझ्युमर प्रोजेक्ट ऑन टेक्नॉलॉजी या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थांसह जगभरातल्या असंख्य चळवळी, संस्था, राजकीय पक्ष सक्तीच्या परवानापध्दतीसाठी आग्रह धरत आहेत.

मात्र विशेषत: अमेरिकेचा प्रयत्न आहे की विकसनशील देशांमध्ये या तरतुदीचा फारसा वापर होऊ नये. खुद्द अमेरिकेने मक्तेदारी विरोधी कायद्यासंदर्भात आजवर असे १०० हून अधिक सक्तीचे परवाने दिले आहेत. यात देशाच्या संरक्षणाबरोबरच औषधांच्या किंमती खाली आणण्याचा उद्देशही होता. '११ सप्टेंबर' च्या घटनेनंतर अँथ्रॅक्स विरोधी औषधे सहज उपलब्ध व्हावीत म्हणूनही अमेरिकेने सरकारी बडग्याचा वापर केला होता. कॅनडाने १९६९ ते १९९२ मध्ये याबाबत चांगली पध्दती अवलंबली होती. ब्रिटन, फ्रान्स, दक्षिण आफ्रिका अशा अनेक देशांनीही हे केले आहे . या सर्व राष्ट्रांनी 'कडक पेटंट-राज्य' आणण्यापूर्वी प्रदीर्घ काळ स्वत:च्या विकासासाठी सोयिस्कर असे कायदे ठेवले होते. आता विकसनशील देशांची हीच गरज आहे हे झुगारुन स्वत:च्या मक्तेदारी फायद्यासाठी बडी राष्ट्रे 'कडक पेटंट-राज्याचा' पुरस्कार करत आहेत. यात कॅनडानेही आता अशीच भूमिका बदलली आहे.

सॉफ्ट वेअर पेटंट: भारताच्या कॉम्प्युटर क्षेत्रावर आघात

पेटंट कायद्यातील बदलाचे सॉफ्टवेअर (कॉम्प्युटर प्रोग्रामिंग) क्षेत्रावर होणारे दुष्परिणाम नजरेआड करुन चालणार नाही. सॉफ्टवेअर पेटंटची मागणी भारतातील उद्योजकांकडूनच विशेषत: नॅसकॉमकडून आली आहे म्हणे! पण भारतात अजून सॉफ्टवेअर उत्पादने अत्यल्प आहेत हे लक्षात घेता ही तरतूद भारतीय उद्योगांना घातक ठरु शकते.

या अलीकडच्या तरतुदीप्रमाणे गणिती अथवा व्यावसायिक पध्दत किंवा अल्गोरियमवर पेटंट घेता येणार नाही. पण

'ज्यांचे कोणत्याही उद्योगात तंत्रवैज्ञानिक उपयोजन शक्य आहे किंवा जे कॉम्प्युटर हार्डवेअरमध्ये अंतर्भूत केले जाऊ शकतात अशा कॉम्प्युटर प्रोग्रामवर पेटंट घेता येईल.' सर्वसाधारणपणे कोणत्याही व्यापारी सॉफ्टवेअरचा कोणत्या ना कोणत्या रुपात औद्योगिक वापर होत असतो. त्यामुळे सर्वच सॉफ्टवेअर पेटंटखाली येवू शकेल. असा एक अख्खा सॉफ्टवेअर उद्योग पेटंटखाली आणणारी तरतूद करत असताना सरकारने त्यावर व्यापक चर्चा वा संसदेतही चर्चा घडवलेली नाही. सन २००४ अखेरपर्यंत उत्पादनाच्या (प्रॉडक्ट) पेटंट विषयक तरतुदी करण्याची फक्त गरज होती. सॉफ्टवेअर पेटंटखाली आणण्याची कोणतीही गरज नसताना भारत सरकारने ही घाई का केली?

> ही मागणी अमेरिकी दबावाखाली तिच्याशी हितसंबंध गुंतलेल्यांकडून आली आहे का अशी शंका घेण्यास वाव आहे. अमेरिका (यूएस) वगळता कोणत्याही प्रगत देशात देखील सॉफ्टवेअर पेटंटची प्रथा नाही! फक्त भारतानेच ती का केली? या पेटंट कायदा बदलाच्या काळातच मायक्रोसॉफ्टचे अध्यक्ष स्टीव्ह बॉलमर भारतात होते आणि मायक्रोसॉफ्ट व नॅसकॉमने काही कार्यक्रम एकत्र घेतले होते, हा काय केवळ योगायोग मानायचा?

२००२ मध्ये सॉफ्टवेअर पेटंटच्या कक्षेत आणले होते, पण यावेळी केलेले आणखी फेरफार गंभीर स्वरूपाचे आहेत. अमेरिकेतील (यूएस) अनुभव असा आहे की सॉफ्टवेअर पेटंटची परवानगी देताच मक्तेदारी बलाढ्य कंपन्यांकडून सॉफ्टवेअर विकास करणाऱ्या छोट्या कंपन्या व व्यक्तींवर प्रचंड दबाव येऊ लागला. सॉफ्टवेअर हे 'कॉपीराईट' खालून काढून 'पेटंट' खाली आणल्याने कोर्टकज्जे, कायदेशीर तरतुदी व औपचारिकता यापोटी वाढणाऱ्या खर्चामुळे नव्या सॉफ्टवेअरचा विकास ही

बाब खर्चिक बनते. बहुसंख्य भारतीय कपन्यांना हा खर्च परवडणारा नाही. त्यामुळे जागतिक सॉफ्टवेअर बाजारपेठेत यापुढे स्वत:ची सॉफ्टवेअर उत्पादने घेऊन आणखी शिरकाव करणे कठीण होत जाईल.

सॉफ्टवेअर पेटंटमध्ये फक्त त्या प्रोग्रामची रचना, बांधणी व आकृतिबंध यावरच एकाधिकार येत नाही तर ज्या कल्पना/कल्पकतेवर तो आधारलेला आहे ती कल्पनासुध्दा पेटंट खाली येते. त्यामुळे कल्पना चोरल्याच्या आरोपाखाली नव्या सॉफ्टवेअर निर्मात्यांना अडकवणे बलाढ्य कंपन्यांना सहजच शक्य होईल. मुळात बहुसंख्य संशोधकांना एखादे सॉफ्टवेअर कुठपर्यंत पोचते आहे व त्याचा भाग आधीच कोणत्या पेटंटखाली आहे का याचा अंदाज येणेही कठीण असते. यातील भाषा व बारकावे हे पेटंट कार्यालय व न्यायालये यांनाही समजण्यासारखी नसल्याने असे दावे दीर्घकाळ चालत राहतात.

भारताचा अनुभव सांगतो की भारतातील सॉफ्टवेअर उद्योगाने उभारी केव्हा धरली ? तर आयबीएम बहुराष्ट्रीय कंपनीला भारतातून हाकलल्यानंतर! जोवर आयबीएम होती तोवर हार्डवेअर व सॉफ्टवेअर हे दोन्ही प्रामुख्याने आयात केले जात असे. आयबीएमला हाकलल्यामुळे तसेच त्याचवेळी युनिक्स ही खुलेपणाने उपलब्ध असणारी प्रणाली वापरता (पेटंट नसलेली) आल्यामुळे भारतातील सॉफ्टवेअर उद्योग वाढू शकले.

आज युरोपात व युरोपीय समुदायाच्या संसदेत सॉफ्टवेअर पेटंटला प्रचंड विरोध आहे. आता तिथे याबाबतची जी तरतूद सुचवली जात आहे ती फक्त हार्डवेअरमध्ये समाविष्ट केलेल्या सॉफ्टवेअरबद्दल. ही तरतूद भारताने आता केलेल्या तरतुदी इतकी व्यापक व घातक नाही. तरी या मर्यादित तरतुदीलाही युरोपात प्रचंड विरोध आहे.

भारताच्या पेटंट कायद्यात सॉफ्टवेअर पेटंटचा मुद्दा पूर्णपणे वगळण्याची गरज आहे. नाहीतर अमेरिकी कंपन्यांची दादागिरी आणि उभारी धरणाऱ्या भारतीय सॉफ्टवेअर उद्योगाची मुस्कटदाबी हे दोन्ही वेगाने वाढत जाईल.

शेतीची कोंडी, त्यात मुसंडी मस्तवाल महाबैलांची!

पेटंट कायद्यातील शेती विषयक ठळक बदल असे आहेत:

• सूक्ष्म जीव (micro-organisms), बिगर-जीवशास्त्रीय (non-biological) व सूक्ष्मजीव प्रक्रिया (Micro biological Processes) यावर पेंटट घेता येतील.

• शेतीशी संबधित रसायनांचे उत्पादन (Product) व प्रक्रिया (Process) असे दोन्ही पेंटट घेता येतील.

मात्र बौध्दिक मालमत्तेचे अधिकार हे व्यापाराशी संबंधित (Trade Related) असल्याने शेती, वनस्पती, जीव-जिवाणू विषयक 'बिगर व्यापारी' ज्ञान, शोध, संशोधन, माहिती यांची देवाणघेवाण, खरेदी (आणि पळवापळवी देखील!) याविषयी पुरेसे संरक्षण नाही ही आजची वस्तुस्थिती आहे.

येत्या काळात सूक्ष्मजीव, तत्संबंधी प्रक्रिया व जीवतंत्रशास्त्राच्या आधारे शेती उत्पादनात क्रांतिकारक वाढ होण्याची शक्यता आहे. हे घडवण्याची आर्थिक- तंत्रवैज्ञानिक क्षमता आणि त्यांचे हक्क (पेंटट, इ.) अमेरिका व युरोपीय समूहात आहेत. त्यामुळे या देशांची निर्यातक्षमता आणखी मोठ्या प्रमाणावर वाढेल.आजच एकट्या अमेरिकेकडे वर्षाला १८ ते १९ कोटी टन म्हणजे जगातल्या अनेक देशांची आयात पुरवेल एवढे अन्नधान्य वरकड आहे. याउलट विकसनशील देशांकडे सध्या असे नक्त वरकड नाही. हे देश सध्या जी काही अन्नधान्य निर्यात करतात ती अतिशय मर्यादित व ठराविक अन्नधान्यांची. तीही मुख्यत: परकीय चलन मिळवण्याच्या दडपणाने व देशांतर्गत जनतेची क्रयशक्ती तुटपुंजी असल्याने एका अर्थी गरीब जनतेला उपाशी ठेवूनच ! त्यात पुन्हा सध्या बहुतांशी विकसनशील देशांची शेतीविकासात कोंडी झालेली आहे. जमिनीचे व पाण्याचे जुने व नवे केंद्रीकरण आहे आणि त्यावरच 'निर्यातप्रधान शेतीचे'चे कलम केले जात आहे. पुरेशी व समन्यायी सिंचनसुविधा नाही. सर्व

प्रमुख पिकांची व जमिनीची उत्पादकता जागतिक सरासरीपेक्षा फारच कमी आहे. सुयोग्य तंत्रविकासासाठी पैसा व दृष्टी नाही.

अमेरिकेतील इंटरनॅशनल फूड पॉलिसी रिसर्च इन्स्टिटयूटच्या मते बहुतांश विकसनशील देशांत अन्नधान्य परिस्थिती बिघडत असून नवे अन्न अरिष्ट निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच प्रगत देशातील अन्नधान्य क्षेत्रातील हितसंबंधियांनी गेल्या दशकात गरीब देशांची अन्नधान्य परिस्थिती सुधारु नये यासाठी अर्थसहाय्यामध्ये सतत अडथळे उभे केले आहेत.

हरित साम्राज्यवादाचा विस्तार

जीवंतत्रशास्त्रामुळे औषधे, जैवअनुवंशिक आजार, रोगांवरच्या लसी, याबरोबरच खाणी,ऊर्जानिर्मिती, रसायने, कृषीरसायने, अन्नप्रक्रिया, पशुपक्षी पालन, रोपे, वनस्पती, बियाणे, जैविकखते व नाशके अशा अनेक क्षेत्रांमध्ये व उत्पादनामध्ये फार मोठे बदल होऊ घातले आहेत.टिश्यू कल्चर, क्लोनिंग, पेशीसंयुजन, गर्भरोपण, जीवतंत्र अभियांत्रिकी यामुळे वनस्पती व पशुंच्या सुनियोजित गुणांसह नव्या जाती कमी वेळेत निर्माण करणे शक्य झाले आहे. यामुळे अधिक उत्पादन, निरोगी जाती, जैवविविधतेत वाढ हे शक्य झाले आहे. बटाटा, कापूस, मका, तांदूळ यामध्ये कीडप्रतिरोधक जीवाणू विकसित करण्याचे तर टोमॅटो, मका,तांदूळ, बटाटा, यात विषाणू प्रतिरोधक विषाणूजनुके घालता येणे शक्य झाले आहे.

रासायनिक खते-कीटकनाशके यावर आधारलेले 'हरितक्रांतीचे'तंत्र सामाजिकदृष्ट्या खर्चिक, आर्थिदृष्ट्या अकार्यक्षम

> १९८० पर्यंत अमेरिकेतही सजीवांवर पेंटट घ्यायला बंदी होती.पण जीवतंत्रज्ञानामुळे आपल्या हाती 'घबाड' लागू शकते याची जाणीव अमेरिकन उद्योगांना झाली. भविष्यात या क्षेत्रात जागतिक वर्चस्व प्रस्थापित करता येईल अशी शक्यता त्यांना दिसू लागली आणि मक्तेदारी मिळवण्यासाठी त्यांनी पावले टाकली.

आणि आरोग्यदृष्ट्या घातक बनत चालले आहे. त्यामुळे पर्यायी तंत्रज्ञानाची गरज अधिकच जाणवते आहे. पाणी, जमीन, हवा, वनस्पती, माणसे व अन्य सजीव यांच्या आरोग्याच्या दृष्टीने जैविक खत (bio-fertilisers) आणि जैविक कीडनाशके (bio-pesticides) अधिक चांगली ठरणार आहेत. प्रदूषण करणाऱ्या कृषीरसायनांच्या जागी जीवाणू, बुरशी, शेवाळे यांचा वापर

शक्य आहे. त्यांचे प्रमाणीकरण होऊन ते सर्वसाधारण वापरात येण्यासाठी आणखी काही संशोधनाची व विकासाची गरज असली तरी नत्र,फॉस्फेट,पोटॅश असे आज रासायनिक खतांमधून दिले जाणारे घटक जैविक माध्यमातून देणे शक्य आहे. उदा. ऱ्हीझोबियासारखे काही जीवाणू व शेवाळे हवेतील नत्र वनस्पतींना शोषता येईल अशा स्वरुपात आणून ठेवू शकतात.याचा वापर तांदूळ, मका, गहू, ज्वारी, इत्यादीच्या उत्पादनात होऊ शकतो. मायक्रोऱ्हीझासारख्या अळंबी, बुरशी झाडे-झुडुपे, गहू, चहा, कॉफी, सोयाबीन यांना जमिनीतील फॉस्फरस व नत्र मिळवून देतात.

यात काही पर्यावर्णीय व जैविक धोके आहेत हे खरे . पण शास्त्रज्ञांसकट सर्वांनाच आज मुख्य धोका दिसतो तो बहुराष्ट्रीय कंपन्यांचा ! आजवरचा जैविक तंत्रज्ञानाचा विकास प्रामुख्याने मक्तेदारी व्यापारी हितसंबंधानी (बि)घडवलेला आहे. त्या विकासात सामाजिक कल्याणाचा कोणताही विचार नाही. ज्यांचे नैसर्गिक पुनरुत्पादन शक्य आहे अशाही उत्पादनांसाठी कृत्रिम पर्याय निर्माण करणे, पिकांमध्ये रोग व कीडनाशकांचा परिणाम होणार नाही अशा जाती तयार करणे, पिकांमध्ये रोग व कीडप्रतिबंधक शक्ती आणण्याऐवजी अन्य कंपन्यांच्या कीटकनाशकांचा परिणाम होणार नाही अशा जाती तयार करणे, जैविक वैविध्याऐवजी एकपीकपध्दती विकसित करणे, विशिष्ट नाशकेच व तीही भरपूर प्रमाणात वापरावी लागतील अशा जाती बनवणे, अशा स्वरुपाचा विकास व वापर करून हे व्यापारी हितसंबंध या क्षेत्रावरची आपली पकड बळकट करत आहेत.

सूक्ष्म जीव व त्यांच्या प्रक्रिया यांच्या पेटंट अधिकारांवर अशी मक्तेदारी प्रस्थापित होण्याचे परिणाम कोणते होतील ? फ्रान्समध्ये बोगवे येथे १९८७ मध्ये भरलेल्या परिषदेत म्हटले आहे ,'शेतीमध्ये हे तंत्रज्ञान उत्पादनात वाढ व खर्चात बचत करेल हे खरे. पण त्याचवेळी ही शक्यता अधिक आहे की शेतीक्षेत्रात जनतेमधील विषमता ते तीव्र करेल, जैविक संपदेचा नाश व एक पीक पध्दती यात वाढ करेल, जीवनाला मूलाधार असणाऱ्या नैसर्गिक व्यवस्थांवर आघात करेल, शेतकऱ्यांचे परावलंबित्व वाढवेल व त्याची आघात सहन करण्याची क्षमता घटवेल आणि बहुराष्ट्रीय कृषी औद्योगिक मक्तेदारांची ताकद आणखी वाढवेल.'

पेटंटची कालमर्यादा २० वर्षे म्हणजे मक्तेदारी वर्चस्व टिकवणे व विकसनशील देशांची तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील 'पिछाडी' टिकवणे हे उघड आहे. या क्षेत्रात झपाट्याने नवे शोध लागतात व नवे शोध अधिक किफायतशीर असतात. अशावेळी २० वर्षे वाट पहायची म्हणजे आपल्यासारख्यांचे या क्षेत्रातील मागासलेपण टिकून राहणार व सतत बहुराष्ट्रीय कंपन्यांची-प्रगत देशांची आघाडी व वर्चस्वच राहणार. भारतीय पेटंट कायद्यानुसार (१९७०) सूक्ष्मजीव, बियाणे-रोपे, रसायने इ. वर तसेच उत्पादनावर (product) पेटंट मिळू शकत नव्हते. त्यामुळेच भारतात संकरित बियाणे, रासायनिक खते-कीडनाशके, यांचा विकास व वापर सध्याच्या चौकटीतच पण काहीसा मोकळेपणाने करता आला. आता शेतीशी संबंधित रसायनांवर पेटंट अधिकार मान्य झाल्याने रासायनिक खते व कीडनाशके यावर मक्तेदारी वर्चस्व स्थापन करणे व त्याची महागाने विक्री करुन नफा कमाई करणे बहुराष्ट्रीय कंपन्यांना शक्य होईल.

दोहा जाहीरनामा

खरे तर वरीलपैकी अनेक समस्या नक्की टाळता येतील.पण त्यासाठी लवचिक तरीही स्पष्ट अशा लोककेंद्री पध्दतीने हा प्रश्न हाताळणे आवश्यक आहे. दोहा येथील ट्रीप्स करार आणि सार्वजनिक आरोग्य विषयक जाहीरनामा यामध्ये हे नमूद आहे की जागतिक व्यापार संघटनेच्या सभासद देशांना सक्तीच्या परवाना पध्दतीचा अधिकार आणि कोणत्या निकषांवर असा परवाना द्यायचा ते ठरवण्याचे स्वातंत्र्य आहे.

जाहीरनामा हे ही स्पष्ट करतो की ट्रीप्स कराराचा अर्थ लावण्याचा अधिकार जागतिक व्यापारी संघटनेच्या सभासद देशांना आहे . तसेच ज्यामुळे देशातील सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्याचा व सर्वांना औषधे मिळण्याची व्यवस्था वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या कराराची अंमलबजावणी करण्याचा अधिकार या देशांना आहे.

भारत सरकारने याचा अर्थ पुरेसा ध्यानात घेण्याची गरज आहे - बहुराष्ट्रीय कंपन्याचा दबाव आणि परदेशी गुंतवणुकीचे आमिष झुगारुन देऊन.

'ट्रीप्स'कराराप्रमाणे विकसनशील देशांना आजच्या चौकटीतही खालील मुद्दयांचा लवचिकपणे वापर करुन जनतेच्या हिताची काळजी घेता येईल:

* काही बाबी पेटंट अधिकारात अपवाद करुन (पेटंट न देणे)
* काही बाबींवर उत्पादनाचे (प्रॉडक्ट) पेटंट नाकारुन
* कंपन्यांच्या माहिती संरक्षणाच्या अधिकाराला मर्यादा घालून
* सरकारी वापरासाठी तरतूद करुन
* इतरांना सक्तीने परवाना देण्याची तरतूद करुन

सक्तीची परवानापध्दती: काळाची गरज

'ट्रीप्स' कराराचे कलम ३१ प्रमाणे मूळ पेटंटधारकाची परवानगीही न घेता सार्वजनिक/राष्ट्रीय हितासाठी अशी पेटंट हक्क तोडण्याची कृती करता येते. म्हणजेच अशा औषधांचे देशांतर्गत उत्पादन करता येईल. बाहेरील देशांवर वा कंपन्यांवर अवलंबून न राहता भारतीय पेटंट कायदा १९७० च्या कलम ९२ प्रमाणे

केंद्र सरकारला विशेष परिस्थितीमध्ये सक्तीने परवाना देण्याचा अधिकार आहे. त्यात हे तत्व अनुस्यूत आहे.

मात्र भारतातील तरतूद पुरेशी नाही. १९७०च्या कायद्यातील कलम ८४ नुसार पेंटट दिलेल्या तारखेपासून ३ वर्षे पूर्ण झाल्यानंतरच पेंटट नियत्रंक कार्यालयाकडे सक्तीने परवाना देण्यासंबधी अर्ज करता येतो. पण कोणत्याही आणिबाणीच्या काळात ३ वर्षे थांबणे हे वेडगळपणाचे ठरेल. त्यात पुन्हा मूळ पेटंटधारकाला आक्षेप घ्यायला संधी आहे. म्हणजे त्यात आणखी कालापव्यय होऊ शकतो. तसेच मूळ कायद्यातील सक्तीच्या परवान्यामध्ये पेटंटखालील वस्तूंच्या वापरांचा (use) उल्लेख आहे कलम ९२, उत्पादन निर्मितीचा (manufacture) नाही. त्यामुळे आता परिस्थिती बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या फायद्याची होऊ शकते व भारतात उत्पादन करण्यास ती पोषक राहणार नाही.

पुढे जाऊन या अध्यादेशान्वये ९२ अ कलम घालण्यात आले आहे. ते गरजू व अविकसित देशांना औषध पुरवठा करण्यासाठी भारतात निर्मिती करण्याची व त्याची निर्यात करण्यासाठी 'सक्तीने परवाना देण्याविषयी' आहे. मात्र त्यात मेख अशी मारलेली आहे की ज्या देशांमध्ये असा सक्तीने परवाना देण्यात आलेला आहे तेथेच अशी निर्यात करता येईल व त्यासाठीच भारतात सक्तीने परवाना दिला जाईल.

यात मोठीच विसंगती आहे आणि ती पुन्हा भारत वा तो गरीब देश या दोहोपेक्षा बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या फायद्याची ठरणारी आहे. एकतर अशा अविकसित/कमी विकसित देशांना पेटंट कायदे करण्याची मुदत सन २०१६ ही आहे. बहुसंख्य कमी विकसित देशात नीट पेटंट कायदेच नाहीत तर तिथे सक्तीने परवानगी देण्याचा मुद्दाच रद्दबातल ठरणार. परिणामी तिथे भारत निर्यात करण्यासाठी सक्तीची परवानापध्दत वापरु शकणार. साहजिकच तिथे पूर्ण व्यापारी तत्वाने ती आवश्यक औषधे पाठविले जातात ज्यात बहुराष्ट्रीय कंपन्या नफा खातील.त्या गरीब देशांना भारताकडून कमी दरात औषधे मिळणार नाहीत, गरीब व विकसनशील देशानी एकमेकाना सहकार्य करण्याचा मुद्दा निकालात निघेल.

जागतिक एड्स दिनानिमित्त ब्राझीलच्या सरकारने केलेल्या घोषणेने बड्या औषध कंपन्यांना हादरा दिला. सरकारचा एचआयव्ही/एड्सग्रस्त रुग्णांना मोफत अँटिरिट्रोव्हायरल औषधे देण्याचा यशस्वी सार्वजनिक आरोग्य कार्यक्रम आर्थिकदृष्ट्या कोसळू नये म्हणून सरकारने अशा औषधांचे पेटंट हक्क तोडून टाकले. ब्राझील एड्स विषयक औषधे अत्यंत स्वस्तात निर्माण करत असून दरवर्षी हा देश ५० कोटी डॉलर्सची बचत करतो, शिवाय ४५ कोटी डॉलर्सची स्वस्त औषधे अन्य देशात निर्यात करतो. 'सक्तीच्या परवानापध्दती' मध्ये ब्राझीलने घातलेली एक नवी भर. इतरत्र ज्या औषधांवर पेटंट अधिकाराची तरतूद आहे अशा औषधांबाबत 'सक्तीची परवानापध्दती' लावण्यास जागतिक व्यापार संघटनेच्या ट्रीप्स करारानुसार परवानगी नाही. पण ठरवले तर कोणताही देश जनतेच्या हिताच्या दृष्टीने औषधकंपन्यांची मक्तेदारी व दादागिरी धाब्यावर बसवू शकतो हेच यातून दिसते.

आता काय केले पाहिजे ?

पेटंट मक्तेदारीचा प्रश्न हा आजच्या साम्राज्यवादी जागतिकीकरणाचा एक महत्वपूर्ण पैलू आहे. त्याविरुध्द विविध पातळ्यांवर लढणे आवश्यक आहे. त्यामध्ये काही तावडतोबीची पावले टाकली पाहिजेत तसेच दीर्घपल्ल्याच्या उपाययोजनाही आवश्यक आहेत.

१) २००२ साली जागतिक व्यापार संघटनेच्या पातळीवर बौध्दिक मालमत्ता अधिकाराच्या कराराचे (ट्रीप्स) पुनर्विलोकन होणे अपेक्षित होते. ते अजून झालेले नाही. भारताने इतर सर्व विकसनशील देशांच्या मदतीने अशा आढाव्यासाठी आग्रह धरावा. हे झाल्या शिवाय आपल्या पेटंट कायद्यातील दुरुस्तीचा विचार होऊ नये.

आपल्या प्रस्तावित कायद्यात खालील तरतुदी केल्या पाहिजेत:

- 'शोध'(Invention) या संकल्पनेमध्ये स्पष्टपणे मूलभूत नाविन्यपूर्ण शोधच पेटंटसाठी विचारात घेतला जावा. 'नाविन्यपूर्ण' 'औद्योगिक वापराची क्षमता' अशा सर्व संकल्पनांच्या स्पष्ट व कडक अंमलबजावणीची तरतूद कायद्यात असावी.

▪ कशावर पेटंट घेता येणार नाही याची स्पष्ट व अधिक व्यापक तरतूद असावी. वनस्पती, रोपे, प्राणी, सजीव जाती-प्रजाती याबरोबरच सूक्ष्मजीव (विषाणूंसह), बिगर-जीवशास्त्रीय तसेच सूक्ष्म जीवशास्त्रीय प्रक्रिया यावर पेटंट घेता येणार नाही अशी तरतूद असावी. थोडक्यात, २००२ ची याबाबतची दुसरी पेटंट कायदा दुरुस्ती रद्द करावी. या मुद्दयावर जागतिक व्यापार संघटनेत अजून विचार विनिमय सुरु असल्याने आपण घाईघाईने गुडघेटेकू भूमिका घेण्याचे कोणतेही कारण नाही.

▪प्रस्तावित कायद्यात सक्तीच्या परवानापध्दतीसाठी पुरेशा तरतुदी आवश्यक आहेत. वाजवी मोबदला देण्याची तयारी दाखवूनही पेटंट धारकाने ठराविक मुदतीत उत्पादनाचे अधिकार प्रदान न केल्यास तत्काळ पेटंट कार्यालयास हस्तक्षेप करणे शक्य झाले पाहिजे. ब्राझील, चीन या देशांप्रमाणे भारताने या कायद्यात तरतूद करावी.

▪ सक्तीचा परवाना देताना भारतीय औषधांच्या निर्यातीस निर्बंध घालणारे कलम बदलून निर्यात सुकर करावी.

▪ सध्याच्या 'मेल-बॉक्स' मधील अर्जांना इथून पुढची २० वर्षे मुदतीची पेटंट दिली जाणार आहेत. त्याआधीपासून संबंधित बाबींचे जे उत्पादन सुरु आहे ते नाममात्र शुल्क (रॉयल्टी) भरुन चालू ठेवण्याची परवानगी दिली जावी. त्यामुळे 'देशी उद्योगांनी आमच्या पेटंट हक्कांचा भंग केला आहे' अशी उद्दाम तक्रार करण्याची संधीच बहुराष्ट्रीय कंपन्यांना मिळणार नाही.

▪ रॉयल्टीची कमाल मर्यादा ४ ते ५ टक्के एवढीच ठेवावी. तशी स्पष्ट तरतूद कायद्यात करावी.

▪ औषधांच्या किंमती वाढू नयेत यासाठी विशेषत: पेटंट खालील औषधांबाबत कडक किंमत-नियंत्रणाची तरतूद करावी.

▪ सॉफ्टवेअर विकासाची मुस्कटदाबी करणारी तरतूद काढून टाकावी. सॉफ्टवेअरबाबत अशी तरतूद करण्याची कोणतीही गरज आज मुळात नाहीच. ही तरतूद त्वरित मागे घ्यावी.

▪पेटंट बहाल करण्यापूर्वी त्याबाबतचा विरोध दर्ज करण्याची आधीची तरतूद तशीच चालू ठेवावी. हे कलम बदलण्याची कोणतीही अट ट्रीप्स करारात नाही. इतर अनेक देश अशी पेटंट देण्यापूर्वीची विरोध-पध्दत आजही अंमलात आणत आहेत.

▪ माहितीचे संरक्षण करण्याचा अधिकार प्रदान करण्याची कोणतीही गरज नाही. अमेरिकी किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या दबावाला बळी पडून अशी कोणतीही तरतूद प्रस्तावित वा अन्य कायद्यात करु नये.

२) वरील तरतूदी या केवळ आजच्या जागतिक व्यापार संघटनेच्या चौकटी अंतर्गत तातडीने करायचे उपाय आहेत. ते महत्वाचे आहेत, आवश्यक आहेत पण पुरेसे नाहीत हे ध्यानात घेतले पाहिजे. तंत्रज्ञान-वापरातील मक्तेदारी वाढण्यामुळे देशाचे विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील स्वावलंबनाला खीळ बसेल. तसेच देशातील उत्पादन आणि रोजगार यावर अनिष्ट परिणाम होईल. देशातील सर्वसामान्य जनतेची, शेतीची व शेतकऱ्यांची मागणी काय आहे? त्यांना औषधे,बी-बियाणे, कृषि रसायने ही माफक दरात व आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध व्हायला हवीत. हे साधायचे आणि सॉफ्टवेअर सारख्या नव्या उद्योगांचे हित सांभाळायचे तर १९७० च्या कायद्याप्रमाणे सर्वच क्षेत्रातील मक्तेदारी रोखणाऱ्या पेटंट कायद्याची गरज आहे. त्यामध्ये स्थानिक व देशी विकास आणि कष्टकरी व सामान्य जनतेच्या गरजा यांना प्राधान्य देणारी धोरणे व कायदे हवेत.

३) पेटंटचा कायदा हा मुळातच ज्ञानावर मक्तेदारी निर्माण करणारा आहे. त्यात या नव्या बदलांनी ही मक्तेदारी वाढणार आहे. ज्ञानाच्या आणि विशेषत: तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील मक्तेदारीला कायद्याने संरक्षण देणे हे समाजात वैज्ञानिक मनोवृत्तीचा प्रसार होण्यास अटकाव करणारे आहे. खऱ्या अर्थी मुक्त विकास करायचा असेल तर विज्ञान - तंत्रज्ञानाचे क्षेत्र आणि एकंदर अर्थकारण हे बहुराष्ट्रीय-मक्तेदारी भांडवलाच्या पकडीतून तर मुक्त व्हायला हवेच; पण त्याही पुढे जाऊन संपूर्ण समाजव्यवस्था भांडवलाच्या व विषमतेच्या पलीकडे जायला हवी.

पेटंट कायद्यातील बदलासाठीचा आत्ताचा लढा या दृष्टिकोनातून व या उद्दिष्टासाठी लढवणे आवश्यक आहे.

✧✧✧✧✧

संदर्भ यादी

* भारतीय पेटंट कायदा, अमेरिकेची दादागिरी/आनंद करंदीकर/लोकविज्ञान संघटना,पुणे/मे १९९२
* भारतीय शेती आणि डंकेलनीती/दत्ता देसाई /समाज विज्ञान अकादमी, पुणे/नोव्हेंबर १९९३
* ट्रिप्स आणि चेंजेस् इन फार्मास्युटीकल पेटंट रेजिम इन इंडिया/सुदीप चौधरी/इंडियन इन्सिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कोलकता/जानेवारी २००५
* पेटंटस् (अमेंडमेंट) ऑर्डिनन्स २००४: अ क्रिटिक/बी. के. केयला/नॅशनल वर्किंग ग्रुप ऑन पेटंट लॉज्, नवी दिल्ली/फेब्रुवारी २००५
* ब्रेकिंग पेटंटस्- इफेक्टीव्ह युज ऑफ कंपल्सरी लायसन्सिंग/फिरोज अली/द हिंदू बिझनेस लाइन/डिसेंबर २००४
* द पेटंटस् (अमेंडमेंट) ऑर्डिनन्स २००४ /मिनिस्ट्री ऑफ लॉ अॅन्ड जस्टिस, भारत सरकार/डिसेंबर २००४
* ऑन सॉफ्टवेअर पेटंटींग /प्रबीर पुरकायस्थ/पीपल्स डेमॉक्रसी/३० जानेवारी २००५
* व्हाय वन मस्ट अपोज पेटंट ऑर्डिनन्स/अर्धेंदू दक्षी/पीपल्स डेमॉक्रसी/३० जानेवारी २००५
* प्रोग्नॉसिस ऑन द न्यू पेटंट रेजिम/विवेक कौल-हसन अहमद/द हिंदू बिझनेस लाइन/डिसेंबर २००४
* रिपोर्ट ऑफ द फोर्थ पीपल्स कमिशन ऑन रेव्ह्यू ऑफ लेजिस्लेशन्स अमेंडिंग पेटंटस् अॅक्ट १९७०/नॅशनल वर्किंग ग्रुप ऑन पेटंट लॉज्, नवी दिल्ली/ऑक्टोबर २००४

भारतीय पेटंट कायदा २००४